# विद्यापीठ देणार संशोधनावर भर

## २०२०-२१ सालासाठी ४५५ कोटी ९६ लाख रुपयांचे अंदाजपत्रक सादर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाने २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी सादर केलेल्या अंदाजपत्रकात संशोधनावर भर देण्यात आला आहे. यासह विद्यार्थी वसतिगृह, अत्याधुनिक सुविधांसाठी चांगली तरतूद करण्यात आली आहे. भविष्यातील संभाव्य महापुरासारख्या धोक्यांवर मात करण्यासाठी शिव सहायता व आपत्ती व्यवस्थापन केंद्राची स्थापना करण्यात आली असून, यासाठी ४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या अंदाजपत्रकावर गुरुवारी सदस्यांकडून



लाख रुपये दाखवण्यात आली असून, खर्च ४६५ कोटी ८६ लाख इतका अपेक्षित असल्याचे म्हटले आहे. यंदाचे

देखभाल, विकास, वेतन, योजना व गुंतवणूक आदीचा समावेश आहे. हा अर्थसंकल्प अधिसभा सदस्य ॲड. धैर्यशील पाटील यांनी सादर केला. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

यंदाच्या अंदाजपत्रकात शैक्षणिक व संशोधन कार्यावर अधिकचा भर दिल्याचे स्पष्ट आहे. संशोधन कार्यासाठी अडीच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थी वसतिगृहासाठी अडीच कोटींपर्यंत तरतूद केली आहे. मुलींचे वसतिगृह, परदेशी विद्यार्थी सुविधा

### बेस्ट रिसर्च ॲवॉर्ड

अर्थसंकल्पात बेस्ट रिसर्च ॲवॉर्डची घोषणा केली. या ॲवॉर्डसाठी यंदासाठी ३ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शिक्षकांना २१ हजार, तर विद्यार्थ्यांना ११ हजार रुपयांचा या निधीतून पुरस्कार दिला जाणार आहे. पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही १० लाख रुपयांची तरतूद आहे. संशोधनातील विविध योजनांचा लाभ घ्यावा म्हणून प्राध्यापकांसाठी १ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

# कवी कुसुमाग्रज महाराष्ट्राचे कविनायक : डॉ. सप्रे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कवी कुसुमाग्रजांच्या एकूण वाङ्मयाचा पिंडधर्म हा कवित्वाचा असून, त्यांच्या काव्यवृत्तीचा संचार समग्र साहित्यातून प्रकट झालेला आहे. विविध प्रकारच्या वाङ्मयातून उभा राहिलेला हा लेखक असून त्यांच्या विकसनशीलतेच्या खुणा त्यांच्या एकंदर वाङ्मयातून प्रकट होतात. 'अनंताचे घर झाले जीवनाचे दार' असे त्यांच्या वाङ्मयाचे केंद्र होते. असा हा महाराष्ट्राच्या समाजमनावर प्रभाव असणारा कविनायक होता. असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक डॉ. अविनाश सप्रे यांनी केले. भौतिकशास्त्र सभागृहात कवी कुसुमाग्रजांच्या स्मृतिदिनानिमित्त 'कवी कुसुमाग्रजांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व' या विषयावर आयोजित व्याख्यानात डॉ. सप्रे बोलत होते.



प्रा. सप्रे म्हणाले, कुसुमाग्रजांवर शेक्सपिअरच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव होता. त्यांची वाङ्मयीन प्रतिमा ही द्वंद्वात्मक स्वरुपाची होती. स्वतःच्या वाङमयीन व्यक्तिमत्त्वाशी प्रामाणिक राहून कुसुमाग्रजांनी वस्तुनिष्ठ जीवनदृष्टीतून लेखन केले. त्यातून त्यांची दृष्टी अभिजातवादाकडे झुकलेली होती. त्यांच्या दृष्टीत मानवतावाद, उदारमतवाद आणि आधुनिकतेचा प्रत्ययही येतो. कल्पनाशीलता हे त्यांच्या वाङ्मयाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. अशा शब्दात सप्रे यांनी कुसुमाग्रजांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व उलगडून दाखविले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कवी कुसुमाग्रज व संत तुकाराम यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षीय मनोगतात मेघा पानसरे म्हणाल्या, साहित्यिकांची निर्मिती आणि भूमिका ही काळाला नेहमी पथदर्शक राहते. कुसुमाग्रजांची कविता काळाशी लढण्याचे बळ देते, त्यामुळे वर्तमान काळाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या शब्दांचे महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे. यावेळी प्रा. लक्ष्मीनारायण तरोडी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन सुश्मिता खुटाळे यांनी केले, तर आभार डॉ. सयाजीराव गायकवाड यांनी मांडले. विविध अधिविभागातील प्राध्यापक, डॉ. रघुनाथ कडाकणे, अनाधी खासबागदार, डॉ. विजया वाडकर व विद्यार्थी उपस्थित होते.

# पेटंट, संशोधन, विद्यार्थी सुविधांना प्राधान्य

## शिवाजी विद्यापीठाचे ४५५ कोटींचे अंदाजपत्रक; दिव्यांग विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पेटंट (स्वामित्व हक्क) घेण्यासाठीच्या खर्चाची तरतूद, शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी संशोधन निधी योजना, बेस्ट परफॉर्मिंग डिपार्टमेंट योजना, दिव्यांग विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण, विद्यार्थ्यांसाठीच्या विविध सुविधांना शिवाजी विद्यापीठाने सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात प्राधान्य दिले आहे. विद्यापीठाचे ४५५ कोटी ९० लाख रुपयांचे अंदाजपत्रक अधिसभेने गुरुवारी मंजूर केले. ते नऊ कोटी ९६ लाख रुपये इतक्या तुटीचे आहे. ही तूट विद्यापीठ निधीतील शिलकेतून भरुन काढली जाणार आहे.

या अंदाजपत्रकावर सुमारे दोन तास चर्चा झाली. त्यात सदस्यांनी विविध मते, सूचना मांडून या अंदाजपत्रकासह विद्यार्थी विकास विभागाचा, विद्यापीठाचा वार्षिक अहवालाला मंजूर केला. विद्यापीठाचे

| तपशील | जमा | खर्च (कोटींत) |
|---|---|---|
| प्रशासकीय विभाग | ४६.६० | ६३.८३ |
| शास्त्र विभाग | ३. ३० | ५.२५ |
| इतर शैक्षणिक विभाग | २.९० | ४.९७ |
| इतर उपक्रम व विविध विभाग | २६.२२ | ४०.६० |
| घसारा निधी | १५.११ | १५.११ |
| संशोधन व विकास निधी | २३.५१ | २३. ५१ |
| वेतन | १२४.२५ | १२९.६८ |
| संस्था | ५.८८ | ९.३६ |
| निलंबन लेखे | २०८.१० | १७३.५६ |
| तूट | ९.९६ | - |

### काही ठळक तरतुदी

- शिव साहायता व आपत्ती व्यवस्थापन केंद्रासाठी फंड फॉर नॅचरल्स डिझास्टरमधून निधीची तरतूद
- विविध स्पर्धा, शिबिरातील विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय उपचारासाठी १० लाख
- बेस्ट रिसर्च अवॉर्डसाठी तीन लाख
- दिव्यांगाच्या सुविधेसाठी दोन कोटी २५ लाख
- संगणक प्रणाली विकसित करण्यासाठी एक कोटी
- शैक्षणिक, संशोधन कार्यासाठी ऑनलाईन बुक्स अँड जर्नल खरेदीकरिता ग्रंथालयास अडीच कोटी
- नवीन वसतिगृह बांधकाम व दैनंदिन खर्चासाठी दोन कोटी ६३ लाख.



सन २०१९-२० चे सुधारित अंदाजपत्रक आणि २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठीचे अंदाजपत्रक अधिसभा सदस्य अॅड. धैर्यशील पाटील यांनी मांडले. विविध शायऱ्या सादर करीत त्यांनी अंदाजपत्रकाला मंजुरी देण्याचे आवाहन सदस्यांना केले. या अंदाजपत्रकात अपेक्षित जमा रुपये ४५५ कोटी ९० लाख, तर एकूण खर्च ४६५ कोटी ८६ लाख आहे. देखभाल, विकास, वेतन, संस्था योजना, निलंबन लेखे यांमध्ये हे अंदाजपत्रक विभागले आहे. त्यामध्ये पेटंट नोंदविण्यासाठी सर्व खर्च विद्यापीठ करणार असून त्यासाठी १० लाखांची तरतूद केली आहे. परदेशी विद्यार्थी, रिसर्च स्कॉलर होस्टेल, कमवा व शिका मुलींचे वसतिगृह बांधकाम, विद्यापीठातील शिक्षकांना संशोधनासाठी निधी, मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनजेमेंट कोर्स, आदींसाठी निधीची तरतूद केली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 MAR 2020
तरूण भारत

# विद्यापीठात चव्हाण यांना अभिवादन



**कोल्हापूर :** महाराष्ट्राचे भाग्यविधाते व पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांची जयंती शिवाजी विद्यापीठात गुरूवारी साजरी करण्यात आली. मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. धैर्यशील पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, यशवंतराव चव्हाण स्कूल फॉर रुरल डेव्हलपमेंटचे डॉ. प्रकाश पवार, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अमोल मिणचेकर, कविता वड्राळे, उमेश गडेकर, गजानन साळुंखे, सुधीर देसाई, संतोष सुतार, अधिकारी, सेवक, विद्यार्थी उपस्थित होते.



कोल्हापूर : संगीत व नाट्यशास्त्र विभागात आयोजित कार्यक्रमात नाट्य सादर करताना विभागाचे विद्यार्थी. (छाया : पप्पू अत्तार)

# संगीत नाटक महोत्सव उत्साहात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागामार्फत संगीत-नाटक महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. मुंबई येथील प्रसिध्द् नाटककार, दिग्दर्शक संभाजी सावंत यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

प्रथम सत्रामध्ये दुपारी संभाजी सावंत यांचे व्याख्यान झाले. सायंकाळी साडेपाच ते सहा या वेळेमध्ये संगीत व नाटयशास्त्र विभागातील विद्यार्थी तोच चंद्रमा नभात या एकांकीकेचे सादरीकरण करण्यात आले.

महोत्सवाच्या द्वितीय सत्रामध्ये ग्वाल्हेर, जयपूर आणि आग्रा घराण्याचे प्रसिध्द गायक डॉ.शशांक मक्तेदार, गोवा यांचे सुश्राव्य गायन झाले. यावेळी निखिल भगत (तबला) आणि अमित साळोखे (संवादिनी) यांची साथ लाभली. यावेळी मराठी अधि विभागप्रमुख डॉ.रणधीर शिंदे यांनी अध्यक्षस्थान भूषविले. यावेळी संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ.श्रीमतीअंजली निगवेकर, प्रा. विनोद ठाकूर देसाई आदी उपस्थित होते.

# विद्यापीठात यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

कोल्हापूर : महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची १०७वी जयंती शिवाजी विद्यापीठात गुरुवारी साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्ष व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. धैर्यशील पाटील, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. प्रकाश पवार, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अमोल मिणचेकर, कविता वड्राळे, उमेश गडेकर, गजानन साळुंखे, सुधीर देसाई आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी-विद्यापीठ, कोल्हापूर

13 MAR 2020

तरुण भारत

# विद्यापीठात संगीत नाट्यमहोत्सवास प्रारंभ

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित संगीत नाट्यमहोत्सवास गुरुवारी दिमाखात सुरुवात झाली. बहारदार शास्त्रीय गायन, ज्ञानेश मुळे यांचे 'तोच चंद्रमा नभात' अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी रसिक प्रेक्षकांना मिळाली. संगीत नाट्यमहोत्सवाचे उद्घाटन ज्येष्ठ नाटककार संभाजी सावंत यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी मराठी भाषा विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे होते.

पहिल्या सत्रामध्ये संभाजी सावंत यांचे 'नाट्यकलेचे बदलते स्वरूप' या विषयावर व्याख्यान पार पडले. त्यानंतर ज्ञानेश मुळे दिग्दर्शित 'तोच चंद्रमा नभात' या एकांकिचे नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी बहारदार सादरीकरण केले.

दुसऱ्या सत्रात गायक डॉ. शशांक मक्तेदार यांच्या शास्त्रीय गायनाने रसिक मंत्रमुग्ध झाले. ग्वाल्हेर, आग्रा, जयपूर या घराण्यांच्या तालमींचा अनोखा मिलाफ मक्तेदार यांच्या सादरीकरणातून अनुभवता आला. याला तबला विभागाचे निखील भगत, हार्मोनिअम साथ अमित साळोखे यांनी दिली.

स्वागत व प्रास्ताविक संगीत व नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांनी केले. विकास कांबळे, अतुल परीट यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. आभारप्रदर्शन डॉ. राजश्री खटावकर यांनी मानले. कलाकारांचा परिचय डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित संगीत व नाट्यमहोत्सवातील 'तोच चंद्र नभात' या नाटकातील एक क्षण. (छाया: रियाज ट्रेनर)